

# तु आहेस म्हणुन..

भाग्यश्री पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# तू आहेस म्हणून

लेखिका : भाग्यश्री पाटील

# तू आहेस म्हणून

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# तू आहेस म्हणून


## लेखिका भाग्यश्री शिवाजीराव पाटील

असिस्टंट प्रोफेसर, ई एण्ड टी सी डिपार्टमेंट

SMSMPITR, अकलूज

मोबाईल: ९०९६८११२७१

ई-मेल: bhagayshri1271@gmail.com


**ले औटींग तसेच मुखपृष्ठाचे डिझाइन: भाग्यश्री पाटील**


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ८ मार्च २०२०



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखिकेची ओळख



नमस्कार!

माझे नाव भाग्यश्री पाटील. मी व्यवसायाने एक इंजिनिअर असून अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीरिंग अँड रिसर्च मध्ये असिस्टंट प्रोफेसर या पदावर कार्यरत आहे.

माझी या आधीची ३ पुस्तके असंख्य वाचकांपर्यंत पोचवल्याबद्दल मी प्रथम ईसाहित्य चे आभार मानते. आजकालच्या धावपळीच्या युगात आल्या मातृभाषेचे महत्व टिकवण्याचे आणि आपल्या मातृभाषेतील लेखन लाखो वाचकांपर्यंत पोचवण्याचे काम ईसाहित्य करत आहे.

सातत्याने घडत असलेल्या स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना मन हेलावून टाकत आहेत. स्त्रिया सुरक्षित नाहीत ही धक्कादायक बाब आहे. याकडे सर्वांनी लक्ष देण्याची गरज आहे. याच जाणिवेतून निर्माण झालेले हे पुस्तक. माझ्या पुस्तकात मांडलेल्या भावना मात्र अत्यंत प्रामाणिकपणे आणि निस्वार्थीपणे मांडलेल्या आहेत. त्या वाचकांपर्यंत नक्की पोचतील असा मला विश्वास आहे. या लेखनाचा हेतू फक्त विचारणा नवीन दिशा देणे आहे. हे लेखन सर्वांना एक नवीन दिशा देईल तसेच पुस्तकाला मिळणार प्रतिसाद माझ्यातल्या लेखिकेला अजून नवीन आणि सुंदर लेखन करण्यास प्रवृत्त करेल हीच आशा.

**प्रोफेसर भाग्यश्री पाटील**

अकलूज

**संपर्क :**

भाग्यश्री शिवाजीराव पाटील


असिस्टंट प्रोफेसर, ई एण्ड टी सी डिपार्टमेंट


SMSMPITR, अकलूज

मोबाईल: ९०९६८११२७१

ई-मेल: bhagyashri1271@gmail.com

**Tip: या पुस्तकातील सर्व लेखन माझेच असून या पुस्तकाचे ले औटींग तसेच मुखपृष्ठाचे डिझाइन मी स्वतः केले आहे**








भाग्यश्री पाटील यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित झालेली यापुर्वीची त्यांची तिन्ही पुस्तके सामाजिक विषयांवरील होती. त्यांना वाचकांकडून अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी, किसान आणि जवान यांच्याबद्दल अत्यंत तळमळीने लिहीलेल्या या तीन पुस्तकांनंतर देशाचे भविष्य घडवणाऱ्या महिलांवरचे हे तिसरे पुस्तक वाचकांना नक्की आवडेल.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/anndatasb_bhagyashri_patil.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/14_02_shouryakatha_bhagyashree_patil.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/eck_bhagyashri_patil.pdf

# मनोगत

नमस्कार वाचक मित्रांनो, नवनवीन पुस्तके वाचताय ना? वाचायलाच पाहिजे.

आता तर वाचनासाठी वाचनालयापर्यंत जाण्याची सुद्धा गरज नाही कारण वाचनालयच तुमच्या हातात आले आहे. तेही वेगवेगळ्या प्रकारची नवनवीन उत्तम पुस्तके घेऊन. पण खरंच या वाचनाचा आपल्यावर प्रभाव पडतो का? असे कोणी मला विचारले तर त्याचे उत्तर मी "हो" असेच देईन कारण वाचनाने माणूस घडायला खूप मोठी मदत होते. त्याचे विचार आचार यात बदल घडून येतो. त्यामुळेच आपले विचार जर खूप लोकांपर्यंत एका क्षणात पोचवायचे असतील तर लिखाण हे उत्तम माध्यम आहे.

याआधीही मी सामाजिक विषयांवर लिखाण केलेलं आहे आणि त्याला वाचकांकडून वेळोवेळी मिळणाऱ्या भरघोस प्रतिसादामुळेच मी अजून लिखाण करायला प्रेरित झाले आहे. यावेळी मी जो विषय घेऊन आले आहे तो तसं पाहिलं तर गंभीर आहे पण समाजाने सहकार्य केले तर नक्कीच या अडचणींवरही आपण मिळून मात करू शकू. तर विषय असा आहे की, सध्याची परिस्थिती पाहता महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत चाललेल्या आहेत. देशाच्या वेगवेगळ्या कानाकोपऱ्यातून रोज कितीतरी घटना समोर येत आहेत. याला कारण नक्की कोण? न्यायव्यवस्था? कायदा? की समाज? हा प्रश्न मला नेहमीच पडत आलेला आहे. पण थोडा विचार केला तर आपल्याही लक्षात येईल की झालेल्या गुन्ह्यासाठी गुन्हेगाराला कडक शासन करणे तर महत्वाचे आहेच जेणेकरून परत कुणी अशा प्रकारचा गुन्हा करायला धजावणार नाही, पण याबरोबरच गुन्हा घडूच नये यासाठी सुद्धा आपण काहीतरी करू शकलो तर खूप प्रश्न सुटतील असे मला वाटते.

आजपर्यंत कितीतरी क्षेत्रात स्त्रियांचे सबलीकरण हीच काळाची गरज आहे. समाजाने  पुढाकार घेतला तर हे ध्येय नक्कीच सध्या होईल हे माझे प्रामाणिक मत आहे. सर्व समाज एक होऊन स्त्रियांचा मान सन्मान त्यांचे सबलीकरण यासाठी नक्कीच पुढे येईल अशी मला अशा आहे. या लिखाणाचा हेतू कुणावरही टीका करण्याचा मुळीच नाही. त्यामुळे कळत नकळत कुणाचे मन दुखावले गेले असेल तर त्याबद्दल क्षमस्व.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण |
| --- | --- |
| १ | मी छकुली बोलतेय.. |
| २ | होय मी मुलगी आहे |
| ३ | भरकटलेली तरुणाई |
| ४ | समाजाची भुमिका |
| ५ | सन्मान स्त्रीशक्तीचा |
| ६ | तू आहेस ना |

# १. मी छकुली बोलतेय..



**मेरे घर आई एक नन्ही परी....**

**एक नन्ही परी....**

एका नाजुक वेलीवर सुंदर कळी दिमाखाने डोलावी तशी मी या जगात आले. माझे आगमन म्हणजे सर्वांसाठी जणुकाही एक सोहळाच होता. आई बाबांची पिल्लु, काका काकींची छकुली, आजी आजोबांची बाहुली, आत्याची चिऊ, मामांची परी! इतकी सगळी नाती फक्त माझ्या येण्याने सर्वाना आणि मला मिळाली. सर्वजण माझ्यावर इतके प्रेम करत की मी भारावून जायचे. मला कोणी एक मिनिट सुद्धा एकटे सोडत नसे. सतत सगळे माझ्या मागेपुढे करत असायचे. कोणी मला चिऊ काऊच्या गोष्टी सांगत, तर कोणी मला प्रेमाने घास भरवत, तर कोणी माझे खळखळणारे हसू पाहण्यासाठी माझ्यासमोर वेगवेगळ्या नकला करून दाखवत. बाहेरच कोणी आलं की सगळेच माझं सतत तोंडभरून कौतुक करत, माझ्या बाललीलांबद्दल भरभरून बोलत. मलाही खुप छान वाटायचं स्वतःच कौतुक ऐकायला. माझी इवलीशी पाऊले दिवसभर इकडून तिकडे दुडुदुडु धावत असत. आमचं घर आणि घरातली माणसं हेच माझं विश्व बनलं होत. का कोण जाणे पण मला आमच्या घरात खूप सुरक्षित वाटायचं आणि बाहेरच जग तर मला माहीतच नव्हतं. मी थोडीशी मोठी झाले. मला बोललेलं समजू लागलं. मी स्वतः पण बोबड्या शब्दात बोलू लागले. सगळ्यांचे कान माझं बोबडं बोलणं ऐकायला आतुर असायचे.

माझं पहिलं पाऊल, मी उच्चारलेला पहिला शब्द हे सगळं सगळ्यांसाठी खूपच खास होतं. रोज सकाळ संध्याकाळ आई, काकी, आजी देवासमोर दिवा लावून नमस्कार करत आणि मलाही करायला सांगत. देवाला "चांगली बुद्धी दे" असं म्हणायला सांगत. "सगळ्यांना निरोगी आणि सुखी

ठेव" असंही म्हणायला सांगत. थोरामोठ्यांचा आदर करावा, सर्वांशी प्रेमाने बोलावे, वागावे हेदेखील शिकवत. आपल्याकडून कोणाला त्रास होईल कुणाला इजा होईल असे वागू नये हेदेखील शिकवत.

मी थोडीशी मोठी होऊन शाळेत जाऊ लागले होते. तिथे आमचे शिक्षक आम्हाला भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत अशी प्रतिज्ञा रोज म्हणायला सांगत. मीही जमेल तितक्या मोठ्या आवाजात प्रतिज्ञा म्हणत असे. आम्ही आमच्या गुरुजनांना खूप घाबरायचो. आमच्या मनात त्यांच्याबद्दल आदरयुक्त भीती होती. शाळेत आम्हाला खूप काही शिकायला मिळायचं. वेगवेगळे खेळ, कवायती, राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, प्रार्थना, दिनविशेष. वेगवेगळ्या महात्म्यांच्या जयंती, पुण्यतिथी असायच्या तेव्हा आमचे शिक्षक आम्हाला भाषण करण्यासाठी प्रोत्साहित करायचे. आम्ही असे खूप काही शिकत होतो. एकंदरीत छान चाललं होत सगळं. पण मध्येच एके दिवशी TV वर एक बातमी आली आणि सगळंच बदललं. का ते माहिती नाही.

एके दिवशी अशीच मी अंगणात खेळत होते. आई भाजी चिरत होती आणि बाबा TV वरच्या बातम्या ऐकत बसले होते. अचानक एक बातमी आली. बातमी अशी होती की एका ताईला कोणीतरी पेट्रोल टाकून रस्त्यात पेटवून दिलं होतं.  बातमी चालू असताना मी आसपासच असल्यामुळे बाबानी TV लगेच घाईघाईने बंद केला. का ते मला समजलं नाही पण ते थोडे चिंताक्रांत दिसले. त्यांना वाटलं मी काहीच ऐकलं नाही पण नेमकं त्यावेळी माझं लक्ष TV कडे होतं त्यामुळे नक्की काय झालं ते पुर्ण समजलं नसलं तरी मी बातमी ऐकली होती.

तेव्हापासून सगळंच बदललं. माझ्या मनात खूप वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न आणि विचार चालू झाले. या प्रश्नांची उत्तरे मी नक्की कोणाकडून घेऊ मला समजत नव्हते. आई  बाबांना विचारायचं धाडस मला होत नव्हतं आणि दुसरं कुणाला विचारावं हेही समजत नव्हतं. माझ्या मनातले प्रश्न असे होते की,

१) त्या माणसाला देवाने चांगली बुद्धी का दिली नसेल? मी तर रोज देवाकडे हेच मागते.

२) आपल्याकडून कुणाला त्रास होईल असे वागणे वाईट असते हे त्या माणसाच्या आईने त्याला शिकवले नसेल का? मला तर माझी आई रोज हेच सांगत असते.

३) सारे भारतीय माझे बांधव आहेत म्हणजे ती ताई त्या माणसाच्या बहिणीसारखी होती मग त्याने ही प्रतिज्ञा कधी म्हटली नसेल का?

एक ना अनेक असे कितीतरी प्रश्न डोक्यात थैमान घालत होते पण उत्तरे काही केल्या सापडत नव्हती. मग विचार केला आपण रोज देवाशी एवढे सकाळ संध्याकाळ बोलत असतो मग कदाचित त्याच्याकडून काही उत्तर मिळू शकेल, पण तिथूनही काही मिळेना. मग मात्र मी उदास झाले. मग विचार केला की कदाचित आपण लहान आहोत त्यामुळे आपल्याला उत्तरे मिळत नसतील. आपण मोठ्या माणसांएवढे मोठे झालो की आपल्याला नक्की उत्तरे सापडतील. पण मग अजून एक प्रश्न.

“मी मोठ्या माणसांइतकी मोठी होईपर्यंत सुरक्षित राहीन ना ? मी माझे शिक्षण, माझी स्वप्ने पुर्ण करेपर्यंत माझ्यावर त्या ताईसारखे एखादे संकट ओढवणार नाही ना?”

हे आणि असेच कित्येक प्रश्न आज मुलींच्या मनात येत आहेत. याला कारण फक्त एक. प्रत्येक मुलीच्या मनात निर्माण होणारी असुरक्षिततेची भावना. तेही सतत वाढत असलेल्या वाईट घटनांमुळे. यामुळे कित्येक कळ्या फुलण्याआधीच कोमेजत आहेत. एकीकडे सर्व परीक्षांमध्ये, सर्व क्षेत्रांमध्ये अग्रेसर असणारी स्त्री आज सुरक्षेच्या बाबतीत मागे पडत आहे. आज स्वातंत्र्यानंतर एवढा काळ उलटून गेला स्त्री स्त्रीला संरक्षणाची गरज भासतेय कारण "परस्त्री मातेसमान" म्हणणारा समाज नक्की कुठल्या वळणावर चाललाय तेच समजत नाही. भारतासारख्या सुसंस्कृत आणि विचारांनी संपन्न असलेल्या देशात जर माणसांना संरक्षणाची गरज पडू लागली तर मग बाहेरच्या शत्रूंची गरजच काय आहे?

आज आपले वीर जवान सीमेवर रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून आपल्या परिवारांपासून दूर राहून देशाची सेवा करतायत. प्रसंगी शहीदसुद्धा होतायत. कशासाठी? ज्या देशबांधवांसाठी ते प्राण तळहातावर घेऊन फिरतात तेच बांधव जर इतर लोकांना आपले बांधव मानत नसतील आणि अशा

प्रकारच्या अमानुष घटना वारंवार घडत असतील तर भारताचे भविष्य धोक्यात आहे असेच म्हणावे लागेल.

आज जर एक मुलगी, एक बहीण, एक पत्नी, एक आई सुरक्षित नसेल तर फक्त संस्कृतीच नाही तर संपूर्ण समाजच विनाशाकडे चालला आहे असेच म्हणावे लागेल, कारण एक सुसंस्कृत आणि सक्षम समाज घडविण्याचे काम स्त्रीच करू शकते. जर तीच सुरक्षित नाही तर समाजसुद्धा सुरक्षित राहणार नाही. मग राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, किरण बेदी, कल्पना चावला यासारख्या स्त्रिया परत जन्माला येतील की नाही सांगता येत नाही. विशेष म्हणजे जिजाऊच जन्माला नाही आल्या तर शिवबा जन्माला कसे येतील? कसे घडतील? आणि शिवबा नसतील, त्यांचे विचार नसतील तर आपल्या संस्कृतीचे, आपल्या मूल्यांचे रक्षण कसे होणार हाही एक प्रश्नच आहे.

कुठलाच माणूस हा जन्मतः वाईट किंवा गुन्हेगार नसतो. तो समाजात आल्यावर गुन्हेगार होतो. म्हणजेच त्याची संगत, त्याच्या आसपासचे वातावरण, यातून तो घडत जातो. मग गुन्हा घडून गेल्यावर गुन्हेगार संपवण्यापेक्षा त्यात ही प्रकृतीच येऊ नये असे काहीतरी घडले तर सगळेच प्रश्न सुटतील. पण एवढा विचार करायला वेळ कुणाकडं आहे? आमच्याकडे रोज १.५ GB डेटा येतो ना! तोच संपवायचा असतो. त्यातूनच वेळ मिळत नाही आम्हाला. कुठे कधी कुणावर अन्याय होत असेल, कोण त्रासात असेल तर आम्ही फोटो, विडिओ काढून ते व्हायरल करू पण मदतीत वेळ वाया घालवणार नाही. उद्या कदाचित आपल्याही जिवाभावाच्या कोणावर मदत मागण्याची वेळ येऊ शकते हे आम्हाला मान्यच करायचे नाही.

ज्या महाराष्ट्रात स्त्रियांकडे वाईट नजरेने बघणाऱ्यांना कडक शासन होत असायचे, त्या ठिकाणी अशा घटना घडत असतील तर कुठे चाललाय समाज? कल्पना करा की आज छत्रपती शिवाजी महाराज, आमचे उर्जास्थान, आमचा अभिमान, अवघ्या मुलुखाचा स्वाभिमान, आमचे दैवत जर या भूमीवर अवतरले तर काय तोंड दाखवणार आहोत आम्ही त्यांना? आपल्या मातृभूमीसाठी, स्वातंत्र्यासाठी, स्त्रियांच्या मान सन्मानासाठी, लढणाऱ्या त्या थोर वीरपुरुषाला आणि त्याच्या

मावळ्यांना हा महाराष्ट्र हा भारत बघून काय वाटेल? याचसाठी त्यांनी इतका खटाटोप केला होता का? याचसाठी अंगावर तलवारीचे वार झालेले होते का?

नुसतेच गाडयांना भगवे झेंडे लावून, कपाळाला चंद्रकोर लावून, गाडयांना महाराजांच्या नावाचे स्टिकर्स लावून मनात शिवविचार रुजणार आहे का? ज्या वयात आम्ही शाळेत जायचो, गृहपाठ करायचो, शुद्धलेखन लिहायचो देवासमोर दिवा लावून नमस्कार करायचो, वेगवेगळे खेळ खेळायचो थोरामोठ्यांचा आदर करायचो, त्याच वयात आजकालची मुलं मोबाइलवर नको त्या गोष्टी बघत असतात. ज्या गोष्टी त्यांना मोठेपणी माहित व्हायला हव्या त्या चुकीच्या वेळी समजत आहेत. हार्मोन्स वेगाने बदलत आहेत. त्यात आईवडील दोघेही नोकरी करणारे असतील तर मग विचारायलाच नको. पुर्ण वेळ फक्त मोबाईल. पालक आणि पाल्य यांमधील संवाद हरवल्यामुळे त्यांच्यात विचारांची दरी निर्माण होत आहे. या बदलत्या लाइफ स्टाइल मुळे मुलांवर ज्या वयात जे संस्कार व्हायला हवे ते न झाल्यामुळे त्यांच्यामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होत आहे. यामुळे पाहिजे असलेली गोष्ट नाही मिळाली की मुलं चुकीच्या मार्गाने ती मिळवण्याचा प्रयत्न करतात. हे कुठेतरी थांबले पाहिजे. मुलांचे पहिले गुरु आईवडील आणि शिक्षक असतात. त्यामुळे त्यांच्या मनात या व्यक्ती तसेच सर्व थोरामोठ्यांबद्दल आदर निर्माण होणे गरजेचे आहे.

**************************************************************

# २. होय मी मुलगी आहे



आज आजूबाजूची परिस्थिती पाहता एक विचार मनात येतो तो असा की मुलगी होणे म्हणजे खरंच गुन्हा आहे का? का दरवेळी तिच्याच वाट्याला त्रास? कधी मुलगा रडत असेल तर आपण मुलांना किती सहजपणे बोलून जातो "मुलींसारखं रडू नकोस!". पण कधीतरी त्यांना हेही शिकवावं की मुलींना रडवू नये. त्यांना त्रास होईल असे काही करू नये. त्यांचा आदर करावा. लहान मुलांना जसे संस्कार मिळतील तसेच ते घडतात. आजची परिस्थिती पाहता जितक्या वेगाने समाज वैचारिक अधोगतीकडे चाललं आहे ते पाहता नवीन सुसंस्कृत समाज घडवायचा असेल तर सुरवात लहान मुलांपासूनच करायला हवी. ते जेंव्हा निरागस निष्पाप असतात, चांगल्या वाईट गोष्टी लगेच शिकतात, अशा वेळीच त्यांना योग्य संस्कार देणे गरजेचे आहे. लहान मुले आणि तरुण वर्ग या दोघांनाही सध्या विचार आणि स्वास्थ्य या दोन्ही दृष्टीने निरोगी ठेवण्याची गरज आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते असे आपण नेहमी म्हणतो. पण मग स्त्रीच नसेल तर पुरुष यशस्वी होईल? किंबहुना तो या जगात तरी येईल? आज कुठे हरवलेत शिवविचार? कुठे हरवलेत संस्कार? कुठे हरवली आहे ती शिकवण जी स्त्रीला सन्मान देते?

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:। यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफला: क्रिया:।।**

अर्थात जिथे स्त्रीचा सन्मान होतो तिथे देवतेचा वास असतो. आणि जिथे स्त्रियांचा मान सन्मान राखला जात नाही, यांचे पूजन होत नाही तिथे केलेले कोणतेच काम पूर्णत्वास जात नाही ते अयशस्वी होते.

आपल्या थोरामोठ्यांची अशी शिकवण असूनही का इतक्या अमानुष आणि अविवेकी वृत्ती समाजात डोकं वर काढत आहेत? का भीती राहिली नाही कुणाची? आपण जपून राहावे अशी शिकवण मुलींना लहानपणापासूनच दिली जाते. सर्वांशी अदबीने वागावे बोलावे, थोरामोठ्यांचा मान ठेवावा, त्यांच्या आज्ञांचे पालन करावे, पेहराव व्यवस्थित असावा, सातच्या आत घरात यावे अशा शिकवणी मुलींना नेहमीच दिल्या जातात. अर्थातच त्यात काळजी लपलेली असते त्यामुळे असे सांगितले जाते, पण हीच शिकवण मुलांना का दिली जात नाही? त्यांच्या वागण्या बोलण्याचा त्यांना जाब का विचारला जात नाही? मुलांनाही संस्कार देणे आता तितकेच महत्वाचे झाले आहे.

सध्याची परिस्थिती बघता मुली प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत. घर सांभाळून करिअर सुद्धा सांभाळत आहेत. मुलींनी सगळीकडे आपले कर्तृत्व सिद्ध केल्यामुळे कुठलेच क्षेत्र फक्त मुलांपर्यंतच मर्यादित राहिलेले नाही. मग इतके सगळे करूनही मुलींवरच अन्याय का? काय चूक आहे त्यांची? त्यांनाही स्वप्न बघण्याचा ती पूर्ण करण्याचा समाजामध्ये मान सन्मान मिळवण्याचा अधिकार आहे.

*************************************************************

# ३. भरकटलेली तरुणाई



देशाचे भविष्य म्हणजे देशातील मुले आणि तरुणाई! जर हे दोन घटक योग्य मार्गावर असतील तर देशाची प्रगती कोणीही अडवू शकत नाही. पण दुर्दैवाने असे दृश्य क्वचितच दिसते की मुलं आणि तरुण आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करतात. कारण बराचसा तरुण वर्ग हा मोबाइल आणि व्यसनासारख्या इतर गोष्टींमध्ये गुरफटलेला दिसून येतो. टेकनॉलॉजि ही गोष्ट जितकी चांगली आहे तितकीच घातकसुद्धा आहे. या गोष्टीचा प्रमाणात आणि कामापुरता वापर केला तर ही सुख आणि यश देईल, पण त्याचे व्यसन जडले तर मात्र ही गोष्ट धोकेदायक आहे. एकीकडे शेतकरीवर्ग काबाडकष्ट करून मेहनत करून आपल्या मुलाबाळांना चांगले आयुष्य मिळावे त्यांची स्वप्ने पूर्ण व्हावी यासाठी झटत आहे. तर दुसरीकडे तरुणाई भरकटली जात आहे. पाश्चात्य संस्कृतीमधले खाद्यपदार्थ, पेय, पेहराव, संगीत याने अक्षरशः तरुणाईला भुरळ घातली आहे.

एक विरोधाभासाचे वातावरण तयार होताना दिसत आहे. ज्या तरुण वर्गाकडे मेहनत करण्याची तयारी आहे त्या वर्गाकडे आर्थिक अडचणींमुळे बेरोजगारी वाढत आहे आणि ज्या वर्गाकडे अमाप पैसे आहे त्यांना कष्ट करण्याची गरज वाटत नसल्यामुळे ते पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करून वाईट मार्गाने पैसे मार्गी लावत आहेत. त्यामुळे तरुणांची बेरोजगारी हादेखील मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. भ्रष्टाचार वाढल्यामुळे पात्रता नसणाऱ्यांना संधी मिळते आणि ज्याची पात्रता आहे त्याच्यावर बेरोजगारीची वेळ येते हे धक्कादायक सत्य आहे. अजून एक शोकांतिका अशी आहे की ज्या गडकोट किल्ल्यांवरती आपले शूरवीर पूर्वज लढले त्यांनी गनिमांना यमसदनाचा मार्ग दाखवला,

त्यांच्या रक्ताने ती माती, तो गड पावन झाला त्याच गड किल्ल्यांची अवस्था बिकट तर होतच आहे, पण त्याच ठिकाणी कित्येक तरुण पार्टी करताना, दारू पिऊन गोंधळ घालताना दिसतात. ज्या ठिकाणी जाऊन प्रेरणा घ्यावी, आत्मविश्वास घ्यावा, दर्शन घ्यावे, आभार मानावे, नतमस्तक व्हावे तिथे अशा गोष्टी घडताना पाहुन त्या शूरवीरांच्या आत्म्याला काय वाटत असेल? आज महाराज असते तर त्यांनी क्षणात सगळ्यांना सरळ मार्गावर आणले असते यात कुठलेच दुमत नाही. ज्या वयात कठोर मेहनत घेऊन भविष्यकाळ घडवायला पाहिजे त्या वयात विचित्र व्यसन जडतात आणि भविष्यकाळ घडायचं सोडून बिघडतो. याचा विचार सर्वानीच करायला हवा. अजून एक व्यसन म्हणजे फॅशनेबल राहणी. फॅशनेबल राहणीमान या एका लेबलखाली आपण स्वतःच काय करून घेतो हे आपल्यालाच समजत नाही. आज थोर विचारवंत आयुष्यात खूप यशस्वी असणाऱ्या प्रतिभावान व्यक्ती, यांच्याकडे पहिली तर एक गोष्ट आपल्या लक्षात येईल ती अशी की ते "साधी राहणी उच्च विचार" म्हणजेच या तत्वानेच यशस्वी झालेले आहेत. त्यांनी त्यांचा जास्तीत जास्त वेळ कर्तुत्वाला दिलाय आणि कमीत कमी वेळ राहणीमानाला. म्हणून ते यशस्वी झाले. आजकालची पिढी नेमकी याच्या उलट वागत आहे. जास्त जास्त वेळ ती दिसण्यावर घालवतेय आणि कमीत कमी वेळ कर्तृत्वावर. अर्थात प्रेझेंटेबल राहू नये या मताची मी अजिबात नाही. स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाकडेही लक्ष द्यावे, पण जास्तीत जास्त महत्व कर्तुत्वाला द्यावे. कारण नुसताच पेहराव चांगला असेल तरच यश मिळेल हा चुकीचा मुद्दा आहे. पेहरावाला महत्व नाही अशातला भाग नाही पण कोणत्याही गोष्टीचा अतिरेक विनाशकारी असतो. आजकालच्या तरुणांना थोरामोठ्यांनी दोन शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या तर त्यांना ते लेक्चर वाटतं. पण ते नक्की कुठे चाललेत हे त्यांनापण माहित नसतं.  सगळीकडेच सारखी परिस्थिती आहे असंही काही नाही. आज कितीतरी होतकरू तरुण अपार मेहनत घेऊन स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवत आहेत. योग्य वयात योग्य मार्गदर्शन मिळाले की नक्कीच काहीतरी चांगले घडते.

मी आधीच म्हटल्याप्रमाणे कुठलाच व्यक्ती हा जन्मतः वाईट नसतो. प्रत्येकामध्ये काही ना काही चांगले गुण असतात. फक्त होते इतकेच की बाहेरील गोष्टी किंवा वाईट सांगत यामुळे

त्याच्यातल्या चांगल्या गुणांवर धूळ चढते आणि नकारात्मक गोष्टींना खतपाणी घातले जाते. त्यामुळे तो वाईट बनतो. गरज आहे ती या वाईट गोष्टींना मुळासकट उपटून टाकण्याची आणि चांगल्या कलागुणांवरील धूळ झटकून ते प्रकाशझोतात आणण्याची. आणि हे काम फक्त समाजच करू शकतो. मुलांची संगत, आचार विचार यांकडे थोडे लक्ष दिले तर हे निश्चितच शक्य आहे, आणि हे सगळ्यांनी प्रयत्न केले तर निश्चितच साध्य होईल असा मला विश्वास आहे.

*************************************************************

# ४. समाजाची भुमिका



समाजातील विकृत मनोवृत्तींना आळा घालायचा असेल तर शिक्षण हाच एक खूप सोपा आणि परिणामकारक मार्ग आहे असे माझे ठाम मत आहे. आज कित्येक मुले शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे योग्य-अयोग्य चांगले-वाईट यातील फरक समजत नाही. त्या दृष्टीने जनजागृती झाली तर नक्कीच फरक दिसून येईल. आपला देश, आपला इतिहास, आपली माती, आपले संस्कार हे मुलांच्या मनात रुजविण्याची गरज आहे. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्यापेक्षा आपली संस्कृती समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण केले तर नक्कीच फायदा होईल. आज कितीतरी देश आपल्या संस्कृतीचे अनुकरण करताना दिसून येतात. जेव्हा एकही मुल शिक्षणापासून वंचित राहणार नाही तेव्हा नक्कीच काही ना काही फरक पडेल.

सर्वात महत्वाचे म्हणजे समाजातूनसुद्धा अशा मनोवृत्ती हटवण्यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. कुठपर्यंत आपण कुठल्यातरी चमत्काराची वाट पाहणार आहोत? जोपर्यंत आपण डोळसपणे सगळीकडे बघत नाही तोपर्यंत काहीच बदलणार नाही. आज दिवसाढवळ्या अमानुषपणे रस्त्यावर एका माणसाला पेटवलं जात असेल, एखाद्यावर अत्याचार होत असेल आणि फक्त कोणी लवकर मदत न केल्यामुळे त्या व्यक्तीचा जीव वाचवला जाऊ शकत नसेल तर याहून मोठी शोकांतिका असेल का? त्यावेळी त्या जीवाला काय यातना होत असतील ते कल्पनेच्या बाहेरचे आहे. एकदा घटना घडून गेल्यावर कितीही आक्रोश केला तरी त्याने काय गेलेला माणूस परत येणार आहे का? आपण खरंच इतके भावनाशून्य होऊ शकतो? मग असाच कोणी कोणाला मदत करणार नसेल तर कशा कमी होतील अशा घटना? यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. आपला भारत, आपला

महाराष्ट्र इतका भावनाशून्य कधीच नव्हता आणि नाही. जिथे स्त्रीचा सन्मान नाही स्त्री सुरक्षित नाही ते राष्ट्र कधीच प्रगती करू शकत नाही जर या अत्याचाराच्या घटना थांबवायच्या असतील तर समाजाला एकजूट होऊन सतर्क रहावेच लागेल. कुठे एखादी घटना घडत असले तर "जाऊ दे ना..मला काय करायचंय" असे म्हणून चालणार नाही, कारण उद्या त्या ठिकाणी आपल्या जिवाभावाची व्यक्ती सुद्धा असू शकते. गुन्हा घडून गेल्यानंतर त्याचा निषेध करण्यासाठी किंवा न्याय मिळवण्यासाठी जी एकजूट असते जो आक्रोश असतो तीच एकजूट जर समोर गुन्हा घडत असताना दाखवली तर नक्कीच अशा घटनांना आळा बसेल. तो दिवसही नक्कीच उजाडेल जेव्हा मुली फुलपाखरांप्रमाणे आत्मविश्वासाने आणि आनंदाने भीतीरहित वातावरणात आयुष्य जगातील आणि त्याचे श्रेय दुसऱ्या तिसऱ्या कुणाला नसून समाजाला असेल.

**************************************************************

# ५. सन्मान स्त्रीशक्तीचा



एखादे महान कार्य घडायचे असेल तर त्याची सुरवात मोठीच व्हायला हवी असे काही नाही. एखाद्या लहानशा गोष्टीतून सुद्धा महान कार्याची मुहूर्तमेढ रोवली जाऊ शकते हे कित्येक महान व्यक्तींनी आजपर्यंत आपल्या कार्यातून सिद्ध केलंय. एका छोट्या कामाचा श्रीगणेशा करून मग हळूहळू त्याचे विधायक कामांमध्ये रूपांतर झालेली खूप उदाहरणे आहेत.

यात पहिले नाव आहे ते राजमाता जिजाऊ यांचे. एक स्त्री जर स्वराज्य स्थापन करणारा महान थोरपुरुष घडवू शकत असेल तर यावरून तिचे सामर्थ्य समजते.

खालील ओळीतून गायलेली जिजाऊंची थोरवी खरंच खूप अप्रतिम आहे.

उन्हाळा अन पावसाळा....स्वराज्याचा गारवा....

जिजाऊच्या जीवावर....न्हाई कुणाची परवा

आम्ही जिजाऊच्या मुली....जशा तलवारीच्या आण्या

होईल तुझीच रे शोभा....बोल दुरून शहाण्या

आम्ही जिजाऊच्या मुली....मिऱ्या परीस तिखट

बोल जपून रे बाबा....आब जाईल फुकट

आम्ही जिजाऊच्या मुली....जशा तलवारीच्या धारा

न्हाई घेणार बघ दादा....कोण्या परायाचा वारा

उन्हाळा अन पावसाळा....स्वराज्याचा गारवा

जिजाऊच्या जीवावर....न्हाई कुणाची परवा

या महान मातेचे जितके गुणगान करावे तेवढे कमीच. शिवबासारखा पुत्र होणे नाही आणि जिजाऊंसारखी माता होणे नाही. जितके थोर संस्कार देऊन जिजाऊंनी शिवबांना घडवले त्याच संस्कारांची आज समाजाला गरज आहे. समाजाला शिवबाची तर गरज आहेच पण जिजाऊंची जास्त गरज आहे.

दुसरे नाव आहे ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचं. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जिथे स्त्री शिक्षण समाजमान्यतेविरुद्ध होते तेथे समाजाचा विरोध पत्करून सावित्रीबाईंनी मुलींच्या शिक्षणाचा श्रीगणेशा केला. त्यासाठी त्यांना परिस्थितीशी झगडावे लागले, कित्येक अडथळ्यांवर मात करावी लागली पण कष्टाची, टीकेची तमा न बाळगता त्यांनी त्यांच्या कार्यकौशल्याने आभाळाची उंची गाठली. आज फक्त आणि फक्त त्यांच्यामुळे कितीतरी मुली घराबाहेर पडून शिक्षण घेतायत. आपल्या घराची जबाबदारी अत्यंत कुशलतेने पार पाडतायत.

नऊवारी साडी नेसलेली, नाकात नथीचा आकडा घातलेली अशी एक मनस्वी स्त्री मुंबईच्या किना-यावर उतरली व तिच्या पदस्पर्शाने भारतातील स्त्रियांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. ती स्त्री म्हणजेच डॉ. आनंदीबाई गोपाल जोशी ! १९व्या शतकात साऱ्या समाजाचा रोष व विरोध पत्करून ही महिला शिकली व पुढे अमेरिकेस जाऊन वैद्यकीय पदवी मिळवून भारतातील स्त्रियांची सेवा करण्याचे व्रत घेऊन भारतात परत आली. भारतातील पहिली महिला वैद्यक (M. D.) म्हणून त्यांचा लौकिक आजही कायम आहे.

किरण बेदी हे या यादीतील न विसरता येणारे नाव. या भारतातील पहिल्या आयपीएस (अखिल भारतीय इंडियन पोलीस सर्व्हिससाठीच्या परीक्षेतून आलेल्या) अधिकारी आहेत. मसूरी येथील राष्ट्रीय अकादमीमध्ये पोलीस ट्रेनिंगमध्ये ८० पुरुष तुकडीतील त्या एकमेव महिला होत्या. किरण बेदी यांची पोलीस अधिकारी म्हणून पहिली नेमणूक दिल्लीच्या चाणक्यपुरीत झाली. पुढे त्या

उत्तर आणि पश्चिम दिल्लीच्या पोलीस आयुक्त झाल्या. त्यांनी कारागृहामध्ये अनेक सुधारणा केल्या. त्याची जागतिक स्तरावर प्रशंसा झाली आणि या सुधारणेसाठी १९९४ मध्ये त्यांना रेमन मॅगसेसे पुरस्कार मिळाला. त्यांनी महिलांवरील गुन्हे कमी करून दाखवले. किरण बेदी यांनी उत्तर दिल्लीच्या डीसीपी असताना ड्रग्जचा दुरूपयोग करण्याऱ्यांविरुद्धच्या मोहिमेची सुरुवात केली. किरण बेदी यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत.

सिंधुताई सपकाळ हेही एक नावाजलेले नाव. अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. येथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाते. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जाते. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत.

या आणि अशा असंख्य महिलांनी आतापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवलेला आहे हे विसरून चालणार नाही. थोडक्यात काय तर स्त्रीशक्तीचा सन्मान हा देशाचा सन्मान ठरणार आहे.

*************************************************************

# ६. तू आहेस ना..



आज पुन्हा एकदा स्त्रीशक्तीची ओळख संपूर्ण जगाला करून देणे गरजेचे झाले आहे. इतकेच नाही तर ती आहे म्हणून समाज सुसंस्कृत आणि सुधारित आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. म्हणून ती आहे आणि कायम असणार आहे. समाजाला योग्य दिशा देण्यासाठी, संस्कार देण्यासाठी ती असणारच आहे. म्हणूनच तिच्या सन्मानार्थ म्हणावेसे वाटते,

नभाचा भरोसा जसा, तसा हा दिलासा तुझा

तरी एकदा सांग ना, आहेस ना....

कधी शारदा तू, कधी लक्षुमी तू

कधी भाविनी वा, कधी रागिणी....

सहस्त्रावधी सूर्य झुकतात जेथे

स्वयंभू अशी, दिव्य सौदामिनी....

तुझ्यावाचुनी शून्य, अवघे चराचर

अशी सर्व्यव्यापी, तुझी चेतना....

तुझी थोरवी, काय वर्णेल कोणी

तुला ज्ञात उमलायच्या वेदना....

तू आहेस ना….

अहोभाग्य अमुचे, तुझ्या या ललाटी

आम्हा प्राप्त झाली, जरा सार्थता….

तुला फक्त तू, जन्म देतेस येथे

तुझ्यावाचुनी वांझ पुरुषार्थ हा….

तू आहेस ना….आहेस ना….

************************************************************

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. भाग्यश्री पाटील यांचं ई साहित्यवरचं हे चवथं पुस्तक.**

प्रा. भाग्यश्री यांची पुस्तके सामाजिक संदर्भांची असतात. त्यांना वाचकांकडून अतिशय उत्तम प्रतिसाद मि्ळतो. किसान, जवान, विद्यार्थी व महिला अशी चार विषयांवरची त्यांची चार पुस्तकं. अत्यंत तळमळीने लिहीलेल्या या चारही पुस्तकांतून त्यांनी देशाचे व समाजाचे भविष्य घडवणारे लेखन केले आहे. एका उज्वल भवितव्याबद्दल आशावादी वृत्तीने केलेले हे लेखन वाचकांना नक्की आवडेल. आपल्याकडून येणाऱ्या प्रतिसादांच्या आधारे त्या अत्यंत मेहनतीने आपल्या लेखनाचा कस वाढवत नेत आहेत. लवकरच त्यांची गणना मराठीतील प्रमुख लेखिकांमध्ये होईल असा आम्हाला विश्वास आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या लेखनाच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, प्रीती सावंत दळवी, अजित पाटणकर  असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान